# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२३

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

### उजनी ते सोलापूर समांतर जलवाहिनीच्या भूसंपादनासाठी येणारा खर्च उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) १११७० (०६-०१-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी ते सोलापूर समांतर जलवाहिनी प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी रुपये १५० कोटी खर्च निश्चित करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उजनी ते सोलापूर ही जलवाहिनी राष्ट्रीय महामार्गाच्या जागेतून टाकून सदर भूसंपादनाचा खर्च रुपये १५० कोटीवरुन रुपये ४८ कोटी पर्यंत कमी करण्याचा निर्णय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त जलवाहिनीच्या भूसंपादनासाठी येणारा खर्च रुपये ४८ कोटी देण्यास नगरविकास विभागाने नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जलवाहिनीच्या भूसंपादनासाठी येणारा खर्च उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०५-२०२३) :** (१) उजनी ते सोलापूर समांतर जलवाहिनी प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. ७ यांनी दिनांक ०९.०७.२०२१ रोजी रुपये १००.९६ कोटी नुकसान भरपाई पोटी खर्च अपेक्षित असल्याबाबत कळविले होते.

(२), (३), (४), व (५) राष्ट्रीय महामार्गाची मंजुरी मिळाल्यानंतर राष्ट्रीय महामार्गाच्या उजव्या बाजूकडून पाईपलाईन टाकणेकामी भा.रा.रा.प्रा. साठी तीस वर्षांच्या लाईसन्स शुल्कापोटी रुपये ४२.०८ व जमिनीचे वापर हक्का करिता संपादनासाठी रुपये ४.८० कोटी अशी एकूण रुपये ४६.८८ कोटी इतकी रक्कम होत होती.

सदर रक्कमेची मागणी शासनास करण्यात आली होती. तथापि, सदर रक्कम स्वनिधीतून उभारावी किंवा शक्य नसल्यास सोलापूर स्मार्ट सिटीच्या प्रकल्प निधीतून या योजनेच्या वित्तीय आकृतीबंधानुसार उभारण्याचे संबंधिताना कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरून राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीत उजव्या बाजूने पाईपलाईन टाकणेकरिता पाच वर्षांच्या लाईसन्स शुल्कापोटी रुपये ३.४८ कोटी व बँक गॅरंटीपोटी रुपये ४.०५ कोटी इतक्या रक्कमेचा भरणा राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे सोलापूर महानगरपालिकेकडून करण्यात आलेला आहे.

---

## वसई-विरार महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या रखडल्याबाबत

**(२) १७०७४ (२५-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिका स्थापन झाल्यापासून मागील १२ वर्षे होऊनही येथील अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या पदोन्नत्या झालेल्या नसल्याचे दिनांक १ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार महानगरपालिकेत १२ वर्षांपासून कार्यरत असलेल्या सरळसेवेतून आलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसई-विरार महानगरपालिका प्रशासनामध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०५-२०२३) :** (१), (२) व (३) वसई-विरार शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना वेळोवेळी पदोन्नती देण्यात आलेली आहे. अद्यापपर्यंत २८४ अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती दिल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शालेय शिक्षण विभागातील कोविडकाळात मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याच्या वारसांना सेवेत सामावून घेणेबाबत.

**(३) १७१२४ (२६-०२-२०२३) श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविडकाळात मृत्यू पावलेल्या शालेय शिक्षण विभागातील कर्मचाऱ्याच्या वारसांना सेवेत सामावून घेणेबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने कोविडकाळात मृत्यू पावलेल्या शालेय शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांच्या वारसांना सेवेत सामावून घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१०-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यातील खाजगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वारसांना अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेणेबाबत शासन निर्णय दिनांक ३१.१२.२००२ अन्वये विहित धोरणानुसार कार्यवाही करण्यात येते.

तसेच मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार अनुकंपा नियुक्तीबाबत प्रलंबित प्रस्तावावर निर्णय घेण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना शासनपत्र दिनांक १४.०९.२०२२ अन्वये संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्राच्या (PITC) जुन्या प्रशिक्षण केंद्रामध्ये अभ्यासिका तयार करण्याबाबत

**(४) १७२९३ (१६-०२-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्राच्या (PITC) जुन्या प्रशिक्षण केंद्रामध्ये १०० विद्यार्थ्यांकरिता बसण्याची सोय असलेली अभ्यासिका तयार करण्याचे ठरविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागेवर उच्च सहसंचालक यांनी आपले अद्ययावत कार्यालय थाटण्याची प्रक्रिया सुरू केली असल्याचे माहे डिसेंबर २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका तयार करण्याऐवजी कार्यालय उभारण्याबाबतचा निर्णय घेण्या-या संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे. (२) व (३) प्रस्तुत जागेवर विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग यांचे कार्यालय माहे ऑक्टोबर, २०२२ पासून सुरु करण्यात आले आहे. माजी विद्यार्थ्यांच्या अभ्यासिकेसाठी सहसंचालक कार्यालयाच्या बाजूला असलेल्या दरबार हॉल व इतर २ खोल्या राखीव ठेवण्यात आल्या असून या खोल्यांचे नूतनीकरण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तराडखेड (जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्याच्या घराव व गोठ्यास रात्रीच्यावेळी आग लावल्याबाबत.

**(५) १७४२२ (२५-०३-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तराडखेड (जि.बुलढाणा) येथील मासरूळ शिवारातील श्री.रमेश आंबेकर यांच्या घरास व गोठ्यास व गोठा ९ लोकांनी दिनांक १२ जून, २०१९ रोजी रात्रीच्या वेळी आग लावली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये रमेश आंबेकर यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून दिनांक ७ सप्टेंबर, २०२२ रोजी मासरूळ येथील गट नंबर २३४ मधील ई-क्लास जमिनीमध्ये पेरलेल्या मका पिकाचेही नुकसान केले हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, नुकसान करणाऱ्यांवर व जीवे मारण्याची धमकी देणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी रमेश आंबेकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालय समोर उपोषण केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसान करणाऱ्यांवर व जीवे मारण्याची धमकी देणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) दिनांक १२.०६.२०१९ रोजी घर व गोठ्याला लागलेल्या आगीसंदर्भात फिर्यादी श्री. रमेश आंबेकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १२.०६.२०१९ रोजी अकस्मात आग रजिस्टरला नोंद करण्यात आली आहे.
(२) होय.
(३) फिर्यादी श्री. रमेश आंबेकर यांनी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आरोपींवर अदखलपात्र गुन्हा दाखल करून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याबाबत तोंडी कळविण्यात आले होते. तथापि, याबाबत लेखी पत्रव्यवहार करून वस्तुस्थिती न कळविल्याने श्री. आंबेकर हे दिनांक ०१.०१.२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे उपोषणास बसले होते.
(४) दि. ०७.०९.२०२२ रोजी फिर्यादी यांच्या शेतातील मका पिकामध्ये गुरे चारून पिकाचे नुकसान करणा-या व त्यांना जीवे मारण्याची धमकी देणा-या तीन इसमांविरुध्द त्यांच्या दि.०८.०९.२०२२ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे धाड, जि.बुलढाणा येथे दि. ०८.०९.२०२२ रोजी गु.र.न.क्र. ५३३/२०२२ कलम ५०४, ५०६ भादंवि प्रमाणे अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, तालुका कार्यकारी दंडाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे दि. १०.०९.२०२२ रोजी आरोपींविरुद्ध प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे.
फिर्यादी यांनी दि. ०८.०९.२०२२ रोजी त्यांच्या शेतातील मका व सोयाबीन पिकांमध्ये गुरे चारून पिकांचे नुकसान करुन त्यांना जीवे मारण्याची धमकी देणा-या इतर नऊ इसमांविरुध्द फिर्यादीच्या दि.०१.०२.२०२३ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे धाड, जि.बुलढाणा येथे गु.र.न. क्र १९/२०२३ कलम ४४७, १४३, १४७, ३२३,४२७, ५०४, ५०६ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील खांदेश्वर पोलिस ठाण्यातील चोरी प्रकरणाचा तपास अद्याप न झाल्याबाबत.

**(६) १७५४६ (२५-०३-२०२३) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन पनवेल येथील नागरिक श्री.आकाश मधुकर पाठक यांच्या निवासस्थानी दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी सुमारे सहा लाख आठ हजार रुपयांची चोरी झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी खांदेश्वर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता परंतु, या घरफोडी प्रकरणाचा अद्याप तपास लागलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे चोरीला गेलेला मुद्देमाल न मिळाल्यामुळे पाठक कुटुंबिय चिंतेत असून या प्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी दिनांक ११ जुलै २०२२ रोजी संबंधित घरफोडी प्रकरणाचा तपास बंद करण्याचा निर्णय घेतला, तथापि, संबंधित प्रकरणाचा तपास बंद न करता चोरट्यांचा शोध घेण्याची श्री. पाठक यांच्या कुटुंबियांनी विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी तपास करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी दिनांक ०६ डिसेंबर,२०२२ रोजी मा.उपमुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित प्रकरणातील चोरटयांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) होय.
(२), (३), (४) व (५)
सदर प्रकरणी दि. १४.११.२०२१ रोजी खांदेश्वर पोलीस स्टेशन नवी मुंबई येथे गु.र.क्र. २५२/२०२१ भा.द.वि. कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा उघडकीस येण्याच्या दृष्टीने व गुन्हयातील अज्ञात आरोपीबाबत माहिती न मिळाल्याने सदर प्रकरण "अ" समरी मंजुरीसाठी दि १७.०८.२०२२ रोजी मा. न्यायालयात सादर करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास बंद करण्यात आला नसून खांदेश्वर पोलीस स्टेशन मार्फत सदर गुन्हा निरंतर तपासावर आहे.
सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी दि.०६.१२.२०२२ रोजी मा. उपमुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे.

---

## पेनबोरी (ता.रिसोड,जि.वाशिम ) येथे शेतकऱ्यांनी बसवलेल्या १८ सोलर पंपाच्या प्लेट्सची अज्ञान चोरट्यांनी मोडतोड केल्याबाबत.

**(७) १७८०० (२५-०३-२०२३) श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेनबोरी (ता.रिसोड,जि.वाशिम ) येथे शेतकऱ्यांनी बसवलेल्या १८ सोलर पंपाच्या प्लेट्सची अज्ञात चोरट्यांनी मोडतोड करुन २३ विदयुत पंपाच्या केबल कापून मीटर विहीरीत टाकण्यात आल्याची घटना माहे जानेवारी,२०२३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांनी पेरलेल्या रब्बीतील गहू, हरभरा, पीक पाण्याअभावी धोक्यात आल्याने धान्याचे नुकसान झाले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चोरट्यांच्या विरोधात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच शेतक-यांना नुकसान

भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) सदर घटनेबाबत पोलीस ठाणे शिरपुर, ता. रिसोड, जि. वाशिम येथे दि.०६.०१.२०२३ रोजी गु. र. क्र. ०९/२३ व १०/२३ भा.दं.वि. कलम ४२७ अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असुन सद्यस्थितीत गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे. शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत महसुल विभागाकडून सविस्तर पंचनामे करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक येथील म्हसरूळ शिवारातील ज्ञानदीप गुरुकुल आधार श्रमात अल्पवयीन मुलींवर झालेल्या अतिप्रसंगाच्या घटनेची चौकशी करण्याबाबत

**(८) १८०२३ (१०-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील म्हसरूळ शिवारातील ज्ञानदीप गुरुकुल आधार श्रमात अल्पवयीन मुलींवर अतिप्रसंग झाल्याची घटना दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०२३) :** (१) होय. (२) सदर घटनेच्या अनुषंगाने म्हसरुळ पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे दिनांक २४.११.२०२२ रोजी गु. र. क्र. २०३/२०२२ भादंवि कलम ३७६, ३७६ (२) (एफ), (आय), (एन), ३७६ (क) (अ), ३५४, ३५४अ, ३५४ क, ३४१, ३४२, ३५४ सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे ४, ६, ८, १०, १२ अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ चे कलम ३(१) (ई), ३(१) (डब्ल्यू), ३(२) (व्ही ए) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच गुन्ह्यातील आरोपीविरुध्द म्हसरुळ पोलीस ठाणे, नाशिक आयुक्तालय येथे गु. र. क्र. २०६/२०२२, २०७/२०२२, २०८/२०२२, २०९/२०२२, २११/२०२२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सटाणा पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे गु. र. क्र. ४६०/२०२२, दिनांक २७.११.२०२२ रोजी सदर आरोपी विरुध्द गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाडी रत्नागिरी (जि.कोल्हापूर) येथील श्री ज्योतिबा देवस्थानचे सेवेकरी, पुजारी व भक्तांना कसायला दिलेल्या जमिनींची विक्री केल्याबाबत

**(९) १८२०३ (१०-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीकडे असलेल्या सुमारे ३ हजार मंदिरांकडे २७ हजार एकर जमिनी असून यातील बहुसंख्य जमिनी पुजारी, सेवक यांच्याकडे कसायला दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडी रत्नागिरी (जि.कोल्हापूर) येथील श्री ज्योतिबा देवस्थानच्या नावे साधारणतः ३ हजार एकर जमीन असून येथील सेवेकरी, पुजारी व भक्तांना कसायला दिलेल्या जमिनींची परस्पर विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने श्री.ज्योतिबा देवस्थान येथील सेवेकरी, पुजारी व भक्तांना कसायला दिलेल्या जमिनी परस्पर विक्री करणाऱ्यांविरोधात कारवाई करुन सदर जमिनी देवस्थानाकडे हस्तांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे. (२) नाही, हे खरे नाही.

(३) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर, धर्मादाय आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व सह दुय्यम निबंधक वर्ग १ व वर्ग २ यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या नोंदवहीत श्री केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी के.ए.२८४६ कोल्हापूर (श्री जोतिबा) या न्यासाच्या जमिनीच्या विक्रीची नोंद झाल्याचे आढळून आले नाही, असे नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१०) १८२१५ (२४-०२-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन विभागात विभागीय अधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक, वन परिक्षेत्र अधिकारी या संवर्गातील जवळपास २५९ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय पदोन्नती समितीची बैठक विहित कालावधीत आयोजित करण्यात येत नसल्यामु सदरहू पदे ळे रिक्त असून वनक्षेत्रपाल संवर्गातील सरळसेवा कोट्यातील रिक्त पदांवर वनपाल संवर्गातील कर्मचाऱ्यांची तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती करण्याकरिता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन व दुय्यम संवर्ग), नागपूर यांचेस्तरावर विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने वनक्षेत्रपाल संवर्गातील पदांवर वनपाल संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबतचे कार्यालयीन आदेश दिनांक ४ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निर्गमित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वन विभागातील विभागीय अधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक, परिक्षेत्र अधिकारी या संवर्गातील रिक्त असलेली पदे कायमस्वरुपी भरण्याबाबत विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. विभागीय वन अधिकारी- ७८, सहायक वनसंरक्षक - ७७ व वनपरिक्षेत्र अधिकारी - २९ अशी एकुण १८४ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे आहे. १) सहायक वनसंरक्षक संवर्गाच्या सेवाज्येष्ठतेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये स्पेशल लिव्ह पिटीशन क्र. ७२८२/२०२१ दाखल आहे. या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.३०.०६.२०२१ रोजी स्थगिती आदेश दिले आहेत. तसेच दि.०२.०२.२०२३ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात अंतीम सुनावणी झाली आहे. मा. न्यायालयाचे आदेश प्रतिक्षेत आहेत. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. २) वनक्षेत्रपाल संवर्गाच्या आपापसातील सेवाज्येष्ठतेबाबत मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र.३८३/२०२२ दाखल आहे. मा.न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार वनक्षेत्रपाल संवर्गाची सेवाज्येष्ठता अंतिम करुन सहायक वनसंरक्षक पदासाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात येईल. ३) वनपाल पदावरुन वनक्षेत्रपाल पदावर पदोन्नती देण्यासाठी शिफारशी करण्याबाबत दि.३०.०८.२०२१ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.
(३) हे खरे आहे. दि.३०/०८/२०२१ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमधील शिफारशीनुसार पात्र १२५ वनपालांना दि.०४.०५.२०२२ रोजीच्या आदेशान्वये वनक्षेत्रपाल पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.
(४) मा. सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लिव्ह पिटीशन ७२८२/२०२१ मध्ये मा. न्यायालयाच्या अंतिम आदेशानंतर विभागीय वन अधिकारी पदासाठी तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुबई येथील मुळ अर्ज क्र.३८३/२०२२ मधील अंतीम आदेशानंतर वनक्षेत्रपाल संवर्गातून सहायक वनसंरक्षक संवर्गात पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हतनूर (जि.जळगाव ) धरणावर डिजीटल भूकंप मापक यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत

**(११) १८२१७ (२७-०२-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूगर्भातील हालचाली जाणून घेण्यासाठी शासनाने राज्यभरात धरण क्षेत्र भागात ३५ ठिकाणी भूकंप मापक यंत्रणा कार्यान्वित केलेल्या आहेत. तसेच नाशिक व यवतमाळ जिल्ह्यात डिजीटल भूकंप मापक यंत्रणा कार्यान्वित केलेली असून २८ ठिकाणी सदर यंत्रणा कार्यान्वित झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर यंत्रणा हतनूर (जि.जळगाव ) धरणावर भूकंप मापक यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. जलसंपदा विभागाने दि.२३ जून,२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात एकूण ३० ठिकाणी अद्ययावत भूकंपवेधशाळा कार्यान्वित करणेचा निर्णय घेतला आहे.

त्यापैकी नाशिक व यवतमाळ जिल्हयातील इसापूर धरण या दोन ठिकाणी अत्याधुनिक डिजीटल यंत्रे बसविली गेली आहेत

उर्वरित २८ यंत्राच्या खरेदीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. यामध्ये हतनूर धरणावरील भूकंपमापन यंत्राचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथे वन्य प्राण्यांकडून पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(१२) १८२१९ (१०-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथे वन्य प्राण्यांनी शेतकऱ्यांच्या पिकांचे हजारो रुपयांचे नुकसान केल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांस नुकसान भरपाई देण्याबाबत प्रस्तावित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात शेत पिकांचे नुकसान टाळण्याकरिता उपाययोजना करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०३-२०२३) :** (१), (२) व (३) जळगाव वन विभागाचे क्षेत्र हे एकूण ८ वनपरिक्षेत्रामध्ये विभागलेले असून मुक्ताईनगर व वडोदा वनपरिक्षेत्राचा विस्तार मुक्ताईनगर, भुसावळ व बोदवड या तीन तालुक्यांमध्ये पसरलेला आहे. सदर क्षेत्रामध्ये दिनांक ०१.०४.२०२२ ते दिनांक २५.०२.२०२३ या कालावधीत वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्याच्या ११७२ घटना निदर्शनास आल्या असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना एकूण रु. ८३,११,५३९/- इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

वन्यप्राण्यांमुळे होणारे नुकसान टाळण्याकरीता क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याच्या पणाची व्यवस्था व्हावी याकरीता कृत्रिम पाणवठे तयार करुन त्यात बारमाही पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- वन्यप्राण्यांकरीता वनक्षेत्रात कुरण विकासाची कामे करण्यात येतात.
- वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई तात्काळ अदा करण्यात येते.

- क्षेत्रिय स्तरावर उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेंतर्गत वन्यप्राण्यांकडून होणारे शेतपिकांचे नुकसान रोखण्यासाठी सौर ऊर्जेवर चालणारे व्यक्तीगत सौर ऊर्जा कुंपण देण्याच्या योजनेस दिनांक २५.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## जळगाव जिल्हातील पोटखराबा क्षेत्र वाहिवाटीखाली आणण्यासंबधीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१३) १८२२५ (१०-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनामार्फत पोटखराब क्षेत्र वहिवाटीखाली आणण्याची मोहीम राबविण्यात आली असून जळगाव जिल्ह्यात सुमारे एक लाख हेक्टर क्षेत्र अद्यापही सातबारा उताऱ्यावर असल्याने शासनाने पोटखराब क्षेत्र वहिवाटीखाली यावे यासाठी आदेश जारी केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव जिल्हातील पोटखराब क्षेत्र वाहिवाटीखाली आणण्याबाबतच्या मोहिमेचे काम संथ गतीने सुरु असून ब्रिटिशकालीन नकाशे व मोजणीचे रेकॉर्ड भूमी अभिलेख विभाग विचारात घेत आहेत, त्यामुळे दिरंगाई होत असल्याने शेकडो प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जळगाव जिल्हातील पोटखराब क्षेत्र वाहिवाटीखाली आणण्याबाबतच्या मोहिमेस गती देऊन प्रलंबित प्रकरणे निकालात काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक १९.०८.२०१९ परिपत्रकान्वये पोटखराब वर्ग अ मधील क्षेत्र जमीन धारकाने लागवडीखाली आणल्यास त्यास लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात अतिरिक्त आकारणी करण्याबाबतची कार्यवाही विहित केलेली आहे.

त्यानुसार पोटखराबासंदर्भातील प्रकरणामध्ये महसूल विभाग व भूमि अभिलेख विभाग यांच्या समन्वयाने तपासणी/छाननी करण्यात आल्यानंतर, प्रकरणामध्ये उपविभागीय अधिकारी यांच्या स्तरावर अंतिम निर्णय घेण्यात येतो. विषयाधीन प्रस्ताव कालबध्दरित्या मार्गी लावण्यासाठी महसूल विभाग व भूमि अभिलेख विभागामार्फत नियमितपणे आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत असून याबाबतचा आढावा दरमहा होणाऱ्या मासिक सभेत घेण्यात येतो.

(४) अशी बाब नाही.

---

## मुंबई येथील तारापोरवाला मत्स्यालय सुरु करण्याबाबत

**(१४) १८२९३ (२५-०३-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापोरवाला मत्स्यालय, मुंबई हे भारतातील सर्वात जुने मत्स्यालय असून सदर मत्स्यालय मुंबई मध्ये येणाऱ्या पर्यटकांसाठी आकर्षण असून सदर मत्स्यालय गत तीन वर्षापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मत्स्यालय बंद असल्याने पर्यटकांना मत्स्यालयास भेट देता येत नसल्याने त्यांची गैरसोय होत असून शासनाचे लाखो रुपयांच्या उत्पन्नाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तारापोरवाला मत्स्यालय पून्हा सुरू करुन पर्यटकांसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०४-२०२३) :** (१) होय.

(२) अंशत : खरे आहे.

तारापोरवाला मत्स्यालय दिनांक २०/३/२०२० पासून कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर प्रेक्षकांकरीता बंद करण्यात आले आहे. तदृनंतर तारापोरवाला मत्स्यालयाच्या मुख्य इमारतीच्या समोरच कोस्टल रोडचे खोदकाम व बांधकाम जून, २०२१ पासून सुरु झाले असून मत्स्यालय इमारतीच्या समोर ५० फुट खोल बोगदा खोदण्यात आला होता. सबब, पर्यटकांना मत्स्यालय आवारात प्रवेश करण्याकरीता आवश्यक रस्ता व इतर सोई उपलब्ध नसल्याने तारापोरवाला मत्स्यालय पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आले आहे. यामध्ये पर्यटकांची गैरसोय होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तारापोरवाला मत्स्यालय पर्यटकांकरीता २० मार्च, २०२० पासून बंद असल्याने शासनास महसूल प्राप्त झालेला नाही.

(३) तारापोरवाला मत्स्यालयाच्या समोरच कोस्टल रोडचे खोदकाम व बांधकामाच्या अनुषंगाने तारापोरवाला मत्स्यालयाची इमारत व बाजुच्या दोन इमारती यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या स्ट्रकचरल ऑडिटच्या अहवालानुसार तारापोरवाला मत्स्यालय इमारत व आवारातील इतर दोन इमारती ज्या जागेवर आहेत त्या जागा निर्लेखित करण्याच्या कार्यपध्दतीबाबत तसेच सदर जागेवर बांधकाम करण्याकरीता एकूण किती FSI उपलब्ध होऊ शकतो, याबाबतची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मागविण्यात आली आहे. सदरची माहिती प्राप्त होताच एक उत्कृष्ट स्वरुपाचे आधुनिक मत्स्यालय उभारण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पारगांव (ता.दौंड, जि. पुणे ) येथील भीमा नदीपात्रात एकाच कुटुंबातील सात जणांची झालेली हत्येची चौकशी करणेबाबत.

**(१५) १८३८८ (२५-०३-२०२३) श्री.सचिन अहिर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) पारगांव (ता.दौंड, जि. पुणे ) येथील भीमा नदीपात्रात एकाच कुटुंबातील सात जणांचे मृतदेह माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे आहे,

३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी यवत पोलीस ठाणे, जि. पुणे येथे गु.र.नं. ८३/२०२३ भा.दं.वि. कलम ३०२, १२०ब, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयाच्या तपासात ६ आरोपी व एक विधीसंघर्षीत बालक यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. यापैकी ५ आरोपींना अटक करण्यात आली असून विधीसंघर्षीत बालकास बाल न्यायमंडळासमोर हजर करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिवरे (ता.शिरुर, जि.पुणे) येथे कायमस्वरुपी तलाठी नियुक्त करण्याबाबत

**(१६) १८३९३ (२५-०३-२०२३) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरे (ता.शिरुर, जि.पुणे) येथील ग्रामपंचायत कार्यालयातील तलाठी सन २०२१ ते माहे जानेवारी, २०२३ या कालावधीत दिर्घ रजेवर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी दिर्घ कालावधीत रजेवर असल्याने त्यांच्या कामाचा अतिरिक्त कार्यभार दोन-तीन प्रभारी तलाठी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्यामुळे त्यांच्यावर कामाचा अतिरिक्त ताण वाढला असून ग्रामस्थांची दैनंदिन कामे, नवीन नोंदी संगणकात घेणे, शेतकऱ्यांचे ७/१२ संदर्भातील कामे करणे तसेच डिजिटल सही नसल्यास त्यावर सही शिक्का घेण्यासाठी अनेक दिवस प्रतिक्षा करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित असलेल्या नोंदी दस्ताऐवजांमध्ये नोंदविण्यात न येणे, शेतकऱ्यांनी पीक कर्ज भरल्यानंतरही ७/१२ च्या उताऱ्यावर कर्जाच्या जुन्या नोंदी ठेवणे, उपनिबंधक यांच्याकडील दस्तऐवजांमधील आक्षेपार्ह नोंदी वगळून इतर नोंदी करण्याबाबत दिरंगाई करणे, इ. कामे प्रभारी तलाठी जबाबदारीने करत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामस्थांची प्रलंबित कामे निकाली काढण्याकरीता तलाठी या पदावर कायमस्वरुपी नियुक्ती करण्याची मागणी ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हिवरे (ता.शिरुर, जि.पुणे) येथील प्रलंबित कामे विहित मुदतीत निकाली काढण्याकरीता या गावात कायमस्वरुपी तलाठी नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सजा हिवरे येथील तलाठ्याच्या रजेच्या कालावधीत सदर सजेचा अतिरीक्त कार्यभार नजिकच्या तलाठ्याकडे सोपविण्यात येवून सजातील गा.न.नं.७/१२ संदर्भातील नागरीकांची सर्व कामे पार पाडण्याची दक्षता घेतली जात आहेत.

तसेच अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात आलेल्या तलाठ्यांविरुध्द कोणत्याही प्रकारची तक्रार तहसिल व उपविभागीय अधिकारी कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

त्याचप्रमाणे सजा हिवरे येथील नागरीकांची कामे प्रलंबित असल्याबाबत अथवा कायमस्वरुपी तलाठी पदावर नियुक्ती करण्याबाबत तहसिल व उपविभागीय अधिकारी कार्यालयास कोणतीही मागणी प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(५) व (६) सन-२०२१ मध्ये सजा हिवरे येथे तलाठी पद रिक्त असल्याने, दि.०१/०१/२०२१ पासून सदर सजेचा अतिरीक्त कार्यभार नजीकच्या कार्यरत तलाठ्याकडे सोपविण्यात आला होता. तद्नंतर दि.१०/१२/२०२१ पासून हिवरे सजेचा कायमस्वरुपी कार्यभार स्वतंत्र तलाठ्याकडे सोपविण्यात आला. तथापि, सदर तलाठी ह्या दि.२१/०६/२०२२ ते दि.१७/१२/२०२२ प्रसूती रजेवर व नंतर दि.१९/१२/२०२२ ते १६/०२/२०२३ पर्यंत बालसंगोपन रजेवर असल्याने सजा हिवरेचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या तलाठ्यास सोपविण्यात आला असून स्थानिक नागरीकांची कामे प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

---

## बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील ‘वनराणी’ मिनी ट्रेन सुरु करण्याबाबत

**(१७) १८४४१ (२०-०२-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये सन १९७४ पासून सर्वांनाच मोहित करणारी ‘वनराणी‘ मिनी ट्रेन पर्यटकांच्या वन सफारीसाठी कार्यान्वित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात येणारे पर्यटक सदरहू मिनी ट्रेनमध्ये वन सफारी करीत असल्यामुळे उद्यानाच्या महसूलात वाढ होत असून निसर्ग व तोक्ते चक्रीवादळात झालेल्या अपरिमित हानीमुळे वनराणी मिनी ट्रेन पर्यटकांसाठी बंद करण्यात आल्याचे दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मिनी ट्रेन ४८ वर्षांपासून कार्यान्वित असल्यामुळे सदरहू ट्रेनचे डिझेल इंजिन बिघडणे, डब्यांची दुरवस्था अशा समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या महसूलात भर घालणारी ‘वनराणी’ मिनी ट्रेन पर्यटकांसाठी अद्ययावत स्वरुपात सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०३-२०२३) :** (१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानास भेट देण्याऱ्या पर्यटकांच्या मनोरंजनाकरीता विशेषत: लहान मुलांकरीता सन १९७४ मध्ये वनराणी (मिनी ट्रेन) कार्यान्वित करण्यात आली होती.
(२) व (३) सन २०२१ मध्ये आलेल्या तोक्ते चक्री वादळात मिनी ट्रेन सुरु असलेल्या रुळावर मोठ्या प्रमाणात अनेक झाडे उन्मळून पडल्याने, तसेच पूरपरिस्थितीमुळे वनराणीच्या रुळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याने सद्यस्थितीत वनराणी बंद करण्यात आली आहे.
(४) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली मधील वनराणीचे कामाकरीता भारत सरकार प्रतिष्ठान अंतर्गत मे. RITES LTD या संस्थते मार्फत Detail Project Report (DPR) तयार करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे मार्फत दिनांक २०.०१.२०२३ रोजी सदर संस्थेस कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) येथील दापचारी दूध प्रकल्प पुन्हा सुरु करण्याबाबत

**(१८) १८५०८ (२६-०२-२०२३) श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १०७९४ ला दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) येथील ५० वर्षाहून अधिक जुना असलेल्या दापचारी दूध प्रकल्पाची निधीअभावी रुपये ५० लाख वीजेची थकबाकी असल्याने विद्युत पुरवठा खंडित केल्यामुळे सदर प्रकल्प बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पातील सामानाची मोठ्या प्रमाणात चोरी होत असतानाही प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होत असून या प्रकल्पाची नव्याने उभारणी करण्याची मागणी लाभधारक यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दापचारी प्रकल्पाची नव्याने उभारणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही. दुग्ध प्रकल्प दापचरी येथील कृषिधारकांकडे वीज देयकापोटी रु.१.४९ कोटी इतकी थकबाकी असून कृषिधारकांकडून थकबाकीचा भरणा केला जात नसल्यामूळे वीज बिलापोटी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे देयक अदा करण्यास मर्यादा येत आहेत. वीज वितरण कंपनीस दि.१७/१/२०२३ रोजी रु.६.५१ लक्ष रकमेचा भरणा शासनाद्वारे करण्यात आला असून वीज पुरवठा खंडीत झाल्यामुळे प्रकल्प बंद करण्यात आला आहे, अशी स्थिती नाही.

(२), (३) व (४) मुंबई व मुंबई उपनगरातील (आरे वसाहतीतील तबेले वगळून) तबेल्यांचे दापचरी येथे स्थलांतर करण्यासाठी जमीन संपादित करण्यात आली आहे. तथापि न्यायालयीन प्रकरणामुळे तबेले स्थलांतरणाची कार्यवाही होऊ शकली नाही. सध्या जमिनीचा ड्रोन/रोव्हर्सद्वारे सर्व्हे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सर्व्हे पूर्ण झाल्यानंतर जमिनीच्या उपयोगाबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

---

## राज्यातील औषध उत्पादकांकडून तयार करण्यात येणारी औषधे स्थिरता चाचणी प्रमाणपत्र न घेता निर्यात होत असल्याबाबत

**(१९) १८५३२ (२६-०२-२०२३) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या औषधांच्या गुणवत्ता असून औषधांच्या स्थिरता चाचण्या (स्टॅबिलिटी टेस्ट) झाल्यानंतरच ही औषधे स्थानिक तसेच जागतिक बाजारपेठेत पाठवणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात राज्यातील २०० औषध उत्पादकांकडून तयार करण्यात येणारी दोन हजारांपेक्षा अधिक औषधे कोणत्याही प्रकारच्या स्थिरता चाचणी प्रमाणपत्र न घेताच निर्यात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातून निर्यात झालेल्या सदोष कफ सिरपमधील हानीकारक घटक द्रव्यांमुळे ६६ मुलांचा मृत्यू झाल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील काही वर्षांपासून या औषधांची चाचणी न करता औषधे निर्यात केली जात असून अन्न व औषध प्रशासन कायद्यामध्ये योग्य ती तरतूद असतानाही निर्यात होणाऱ्या या औषधांच्या उत्पादकांसाठी विशेष सवलत दिली जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील औषध उत्पादकांकडूनऔषधांच्या स्थिरता चाचण्या (स्टॅबिलिटी टेस्ट) न करता हजारो औषधांच्या होत असलेल्या पुरवठ्याच्या गैरप्रकारास आळा घालण्याच्या दृष्टीने तसेच अन्न व सौंदर्य प्रशासन कायद्यामध्ये असलेल्या तरतुदींची कठोरपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१०-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. राज्यातील २०० औषध उत्पादकांकडून तयार करण्यात येणारी दोन हजारापेक्षा अधिक औषधे कोणत्याही प्रकारच्या स्थिरता चाचणी प्रमाणपत्र न घेताच निर्यात होत असल्याची बातमी दि. ०९.०२.२०२३ रोजी वृत्तपत्रात प्रकाशित झाली होती. तथापि, अन्न व औषध प्रशासनाकडे अशा प्रकरणाची कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे आहे.

सदर औषध मेडेन फार्मास्युटीकल्स लिमीटेड, हरियाणा येथून निर्यात झालेले आहे. महाराष्ट्र राज्यातून सदर औषध निर्यात झालेले नाही.

(३) हे खरे नाही.

(४) ॲलोपॅथिक औषध उत्पादक स्थिरता चाचणी पडताळणीबाबत तरतुदींचे अनुपालन करतात किंवा कसे याबाबत नियमित तपासणीच्या वेळी पडताळणी करण्यात येते. उत्पादकांकडून उल्लंघने अथवा त्रुटी

आढळून आल्यास औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतर्गत कारवाई घेण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळांमध्ये शारीरिक शिक्षकांची पदे भरण्याबाबत.

**(२०) १८६५७ (०२-०३-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय मुला- मुलींच्या बौद्धीक, शारीरिक, भावनिक व सामाजिक विकासासाठी नियोजनपूर्वक दिले जाणारे शिक्षण म्हणजे शारीरिक शिक्षण असतानाही मागील बारा वर्षापासून शारीरिक शिक्षकांची भरती झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शारीरिक शिक्षणामुळे निर्णय शक्तीचा विकास, आत्मविश्वास, सदाचार, धैर्य, प्रामाणिकपणा, वक्तशीरपणा, दया, न्याय, तत्परता, निष्ठा, सहकार्य, बंधुभाव, आदरभाव, संघभावना, खिलाडूवृत्ती, नेतृत्व, आज्ञाधारकपणा, सेवावृत्ती, सत्यप्रियता, शिस्त आदी वैयक्तिक व सामाजिक गुणांचा या शिक्षणाच्या माध्यमातून विकास होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शारीरिक शिक्षकांची भरतीच होत नसल्याने भविष्यात उत्कृष्ट खेळाडू घडविणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शारीरिक शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत तसेच भविष्यात उत्कृष्ट खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१०-०३-२०२३) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) सन २०१२ मध्ये विशेष पडताळणीमध्ये बोगस विद्यार्थी संख्या आढळून आल्याने तसेच अतिरिक्त शिक्षक समायोजन करण्याकरीता तसेच कोव्हीड १९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे राज्याच्या आर्थिक स्थितीचा विचार करुन शिक्षक पदभरती बंदीबाबत वेळोवेळी निर्णय घेण्यात आला असल्याने, शारीरिक शिक्षकांची पदे भरण्यात आलेली नाहीत.

आता शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीचे दिनांक २२ फेब्रवारी, २०२३ ते ३ मार्च, २०२३ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था व व्यवस्थापनाने केलेल्या मागणीनुसार पवित्र पोर्टलद्वारे शारीरिक शिक्षकांची पदे उपलब्ध होतील

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.